# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 13/04/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### दुखापत

1) पो.स्टे. बोरी :- अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा आंजनगाव येथे दिनांक 11/04/2021 ते दिनांक 12/04/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे- सुनिल गोविंदराव कुनधाटकर वय 35 वर्ष रा. आंजनगाव याचे घराचे जागेमधुन आरोपी नामे- 1) विजय गोविंदराव कुनघाटकर वय 50 वर्ष, 2) गौरव विजय कुनधाटक, 3) रनजित विजय कुनधाटकर वय 24 वर्ष सर्व रा. आजंनगाव यांनी नळाची नाली खोदली होती. याकारणावरून आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये वाद होवुन आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे डावे हातावर दंडाचे मनगटावर लाकडी काठीने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 325, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक आशिष टेकाम मो क 9075021491 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :- अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा आंजनगाव येथे दिनांक 12/04/2021 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे- हा आपल्या शेतातुन आपल्या मो.सा. ने घरी परत येत असता रोड वर त्याचा काका सुनिल कुनघटकर याची ॲक्टीवा गाडी रोड चे बाजुला उभी होती व तेथून बकऱ्या जात असता फिर्यादीचे गाडीचे आवाजाने बकरीचे पिल्लु घाबरले व गाडीला जावून धडकले त्यामुळे काका सुनिल कुनघटकर याची गाडी खाली पडली माझी गाडी तु का पाडली या कारणावरून फिर्यादीचे डोक्याला व डाव्या हाताला काठीने मारून जख्मी केले व मोठे वडील यांनी पाहून घेण्याची धमकी दिली. 1) सुनील कुनघटकर वय 35 वर्ष व 2) मधुकर कुनघटकर वय 25 वर्ष दोन्ही रा. आजणगाव ता.हिंगणा जि. नागपुर

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- रंजीत विजय कुनघटकर वय 24 वर्ष रा. आजणगाव ता. हिंगणा जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 325, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक आशिष टेकाम मो क 9075021491 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर- दिनांक 12/04/2021 चे 13.30 वा. सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ तिवारी 968981486 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर